**ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ**
**ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003**

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD**
**Malleshwaram, Bengaluru – 560 003**

# 2024-25ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ-2
# S.S.L.C. MODEL QUESTION PAPER-2 : 2024-25

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
## Subject : First Language — MARATHI

**ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M** **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು ] [ Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100** ] [ Max. Marks : **100**

---

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.

2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.

3. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

[ Turn over

**I. खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :**

**6 × 1 = 6**

1. 'जगन्नाथ' या संधीचा विग्रह ........... असा होतो.

(अ) जग + नाथ (ब) जगत् + नाथ

(क) जगत + अनाथ (ड) जग + ननाथ

2. 'माझे डोके किल्ल्यात पाडावे.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा –

(अ) षष्ठी विभक्ती (ब) पंचमी विभक्ती

(क) चतुर्थी विभक्ती (ड) सप्तमी विभक्ती

3. 'पोलिसांनी चोर पकडला.' या वाक्यात हा प्रयोग आहे –

(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग

(क) भावे प्रयोग (ड) यापैकी नाही

4. 'मधूने लाडू खाल्ला असेल.' या वाक्यात हा काळ आहे –

(अ) पूर्ण भविष्यकाळ (ब) वर्तमानकाळ

(क) भूतकाळ (ड) अपूर्ण भूतकाळ

5. 'ऊस गोड लागला म्हणून .............' ही म्हण पूर्ण करा.

(अ) मुळासकट तोडु नये (ब) मुळासकट लावु नये

(क) मुळासकट खाऊ नये (ड) सगळयांना वाटु नये

6. 'मूर्ती जेथे असते तो देवालयातील भाग.' या शब्दसमूहासाठी एक शब्द हा आहे –

(अ) शिखर (ब) गाभारा

(क) सभामंडप (ड) कीर्तनालय

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा : 4 × 1 = 4**

7. क्षणाक्षणाला : अव्ययीभाव समास : : स्वयंपाकघर : ..............

8. 'अरेरे !' : केवलप्रयोगी अव्यय : : झाडावर : ..............

9. तारूण्य : यौवन : : नयन : ..............

10. सफल : असफल : : जलद : ..............

**III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 7 × 1 = 7**

11. सर्वांसाठी विषयव्यवस्था कोण करतो ?

12. कोणत्या वयोगटातील मुलं शिबिरात दाखल झाली ?

13. गुराखी ढोरे कशी वळितो ?

14. पाहुणे केव्हा आले ?

15. शिक्षणामुळे माणसांमध्ये कोणता बदल होतो ?

16. गुराख्याला जेवू घालण्यासाठी काय हवे असे आईला वाटते ?

17. आईच्या डोळ्यात पाणी का आले ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** **3 × 2 = 6**

18. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(अ) हवाली करणे

(ब) हेटाळणी करणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

'क्रीडांगण जणू चंचल सुंदर भाल तुझे हे गडे'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

'मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी.'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला ?

22. ''तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता ? तो पुण्यवान आहे !'' संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

23. 'उत्तम कांबळे' यांचा परिचय लिहा.

24. गंगूबाईंच्या गळयावर शस्त्रक्रिया का झाली ? त्याचा काय परिणाम झाला ?

25. 'विंदा करंदीकरांचा' परिचय लिहा.

26. ''भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा'' संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

27. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

28. (अ) जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण.

**किंवा**

(ब) पुढच्यास ठेच मागचा शहाणा.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा : 10 × 3 = 30**

29. 'विद्या' या दैवताबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

30. 'पावसाळयाचा हिशेब' लेखकाने कसा घातला आहे ?

31. चाफ्याच्या झाडाला लेखक ''बडी माँ'' का म्हणतात ?

32. गणातात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता ?

33. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

35. कवी कोणाकोणाचे गुणगान करू इच्छितो ? व का ?

36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण व कशा प्रकारे याचना करीत आहेत ?

37. स्त्रिया स्वतःला कसे समजावतात ?

38. 'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. 'हाऊस वाइव्हज' या संस्थेची माहिती लिहा.

**किंवा**

'जपानी स्त्री' यावर टीप लिहा.

40. लेखकाने काकूंना कामावरून काढून का टाकले ? सविस्तर लिहा.

41. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा तुमच्या शब्दात सारांश लिहा.

**किंवा**

भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?

42. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

त्या काळी धरणीच्या ........................

...............................................

...............................................

...............................................

...............................................

...................... अवचित हो साकार ।।

**किंवा**

मातीची ही मात ............................

................................................

................................................

................................................

................................................

.......................... पवन करी संचार ।।

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा : 1 × 4 = 4**

43. 'हास्य' ही जीवनाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. वाङ्मयामध्ये त्याला रसाचे स्थान प्राप्त झाले आहे. शब्दांच्या योजनेने हास्यरस निर्माण करणे ह्याला विनोद म्हणतात. सुशिक्षित अन् सुसंस्कृत माणसांच्या समाजात आणि वाङ्मयात विनोदाला फार मोठी प्रतिष्ठा आहे. किंबहुना विनोदबुद्धी असणे हे संस्कृतीचे लक्षण समजले जाते. 'विनोद' हा काही नुसता शब्दांचा खेळ नाही. ती जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बुद्धीचा विकास झाल्यावाचून ही दृष्टी त्यांना प्राप्त होत नाही. ज्या समाजात व्यक्तीना संपूर्ण स्वातंत्र्य आहे त्या समाजात तारूण्याचे वातावरण उत्पन्न होते. खेळ, कला, उत्सव यांची वाढ होते; आणि सामाजिक जीवन समृद्ध होते. आशावादित्व, औदार्य, खेळाडूपणा आणि सहानुभूती ह्या सद्गुणांचा अशा समाजात विकास होतो आणि मग त्यामधून विनोदाचे तत्वज्ञान निर्माण होते.

**प्रश्न** :

(अ) विनोदाचे मानवी जीवनातील महत्व कसे सांगितले आहे ? 2

(ब) सद्गुणांचा विकास कोणत्या समाजात होतो ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

44. रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या अडथळ्याबद्दल पोलीस खात्याकडे तक्रार अर्ज लिहा.

**किंवा**

अग्निवीर म्हणून सैन्यात भरती झालेल्या तुमच्या मित्राचे पत्राद्वारे अभिनंदन करा.

**XI. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लिहा :** **1 × 5 = 5**

45. (अ) युवा पिढी आणि वाढती व्यसनाधीनता

(ब) एका शेतकऱ्याचे मनोगत.